क्रमांक : ९२

# <u>महाराष्ट्र विधानपरिषद</u>

## <u>पत्रक भाग दोन</u>

### <u>मंगळवार, दिनांक २१ डिसेंबर, २०२१/अग्रहायण ३० ,१९४३ (शके)</u>

९६. मा.विधानपरिषदेच्या सर्व सदस्यांना अवगत करण्यात येते की, बुधवार, दिनांक २२ डिसेंबर, २०२१ रोजीचे दोन्ही सभागृहाचे कामकाज संपल्यानंतर "मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी जन प्रबोधनाकरिता तयार केलेला लघुपट" मध्यवर्ती सभागृह, विधान भवन, मुंबई येथे सन्मा. सदस्यांना दाखविण्यात येणार आहे आणि २००० वर्षांपूर्वीच्या मराठी भाषेच्या प्रवासादरम्यानची माहिती देणाऱ्या विविध सबळ पुराव्यांचे आणि संबंधित शिलालेख, ताम्रपट, नाणी, भाषेचे टप्पे, दुर्मिळ ग्रंथ, निवडक गाथा इत्यादींच्या प्रतिकृतींचे वैशिष्टपूर्ण दालन विधान भवन, मुंबई इमारतीच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ उभारण्यात आलेले आहे. तसेच मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त होण्यासंदर्भात महामहिम राष्ट्रपती महोदय यांना पाठवावयाची पोस्टकार्ड सन्मा.सदस्यांना वितरीत करण्यात येणार आहेत. त्यापैकी एका पोस्ट कार्डवर सन्मा.सदस्यांनी स्व-स्वाक्षरी करावी व उर्वरित पोस्टकार्डवर अन्य व्यक्तिंची स्वाक्षरी घेण्यात यावी. सदर पोस्टकार्ड वितरणाची व्यवस्था सन्माननीय सदस्यांच्या हजेरीपटाजवळ करण्यात आलेली आहे.

उक्त लघुपट महाराष्ट्र विधानमंडळाच्या **<u>www.mls.org.in</u>** या संकेतस्थळावरील मराठी भाषा समिती सदराखाली उपलब्ध करुन देण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

---

विधान भवन,<br>मुंबई.<br>दिनांक : २२ डिसेंबर,२०२१

**राजेन्द्र भागवत**<br>प्रधान सचिव,<br>महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

**<u>प्रत माहितीसाठी</u> :**

१. मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव
२. मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी
३. मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी
४. महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सर्व सन्मा.सदस्य.
५. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.
६. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष.
७. संगणक कक्ष (Website)